केस नं. रेफरन्स आयडीए नं. 45/2018
निशाणी यु–101

**<u>व्दितीयपक्षातर्फे साक्षीदार क. 2 ची साक्ष</u>**
**<u>शपथेवर साक्षीदाराची पुढील सरतपासणी – श्री.बी. आर. कावरे यांच्याव्दारा</u>**

**01.** मी निशाणी यु–101 वर माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे. मी अभिलेखावर यादी निशाणी यु–11 सोबत अनुक्रमाक 368 वर सेवायोजन कार्यालयातर्फे दिलेली यादी व पत्राची प्रत दाखल केली आहे. तसेच औरंगाबाद जालना ग्रामीण बॅंकेच्या सरव्यवस्थापक यांची एकुण 4 पत्रे तसेच क्षेत्रिय व्यवस्थापक यांचे पत्र, सरव्यवस्थापक यांनी मला दिलेले पत्र, क्षेत्रिय व्यवस्थापक यांनी शाखाधिकारी यांना दिलेले पत्र, औरंगाबाद–जालना ग्रामीण बॅंकने मला दिलेले पत्र, क्षेत्रिय व्यवस्थापक यांचे पत्र, शाखाव्यवस्थापक यांचे पत्र, क्षेत्रिय व्यवस्थापक यांचे पत्र, इत्यादी दस्त दाखल केलेले आहेत. (सदर दस्तांना निशाणी कमांक देण्यास प्रथमपक्षाच्या वकीलांनी हरकत घेतली. त्यांच्या कथनानुसार सदर दस्त साक्षीदाराने तयार केलेले नाहीत, त्यावर त्याच्या सहया नाहीत, त्यामुळे त्यांना निशाणी कमांक दिला जावु शकत नाही.) हरकत कायम ठेवुन सदर दस्तांना निशाणी कमांक **<u>यु–113 ते यु–126</u>** देण्यात आले.

सरतपास – पुर्ण...

**<u>उलटतपास – प्रथमपक्षातर्फे विधीज्ञ श्री. पी.एल.शहाणे यांचेव्दारा</u>**

02. हे म्हणणे खरे आहे की, ज्या जाहीरातीला अनुसरुन मी नियुक्तीकरीता अर्ज दाखल केला होता ती जाहिरात मी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, बॅंकेने अशी कोणतीही जाहिरात प्रसिध्द केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मला मुलाखतीकरीता बोलाविण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे मुलाखतीचे पत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्या दिवशी काम उपलब्ध असेल त्यादिवशी बॅंकेमार्फत मला बोलाविण्यात येत होते. हे म्हणणे खरे नाही की, बॅंकेने निवड समितीचे गठन केलेले नव्हते. निवड समितीच्या सदस्यांची नावे आज मला सांगता येणार नाही. समितीत कोणकोणते अधिकारी होते ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, निवड समितीबाबत खोटा मजकूर मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात नमूद केलेला आहे.

03. माझे शिक्षण 9व्या वर्गापर्यंन्त झालेले आहे. माझे शपथपत्र मी वाचलेले आहे. त्यात काय लिहीले आहे ते मी सांगू शकतो. हे म्हणणे खरे नाहीं कीं, बॅंकेच्या विलीनीकरणानंतर कार्यरत असलेल्या कर्मचा–यांना नविन बॅंकेत त्याच पदावर समायोजन करण्याची तरतूद नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं की, दि.25.03.2008 ची अधिसुचना रोजंदारी कर्मचा–यांना लागू नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं की, माझी 240 दिवसाची अखंड सेवा झाल्याचे मी खोटे कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाहीं कीं, 240 दिवस सेवा झाल्याबाबतचा पुरावा मी सादर केलेला नाहीं. बॅंकेने काढलेले परिपत्रक, ठराव यांचा उल्लेख मी परिच्छेद क.2 मध्ये केला आहे, परंतु त्याच्या तारखा मला सांगता येणार नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, दि.24.01.2009 चे महाराष्ट गोदावरी ग्रामीण बॅंकेचे खोटे पत्र मी दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही कीं, मी बॅंकेच्या अटी पुर्ण करत नसल्यामुळे कायम कर्मचारी म्हणुन मला नियुक्ती देता येणार नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, माझ्या कामाचे स्वरुप हे कायमस्वरुपी कामगाराप्रमाणे आहे असे मी खोटे सांगत आहे.

04. सन 2018 मध्ये मी लासुर स्अेशन, ता.गंगापूर या शाखेत कार्यरत होतो. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मी स्टेटमेंट ऑफ क्लेम सोबत खोटे परिशिष्ठ दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाहीं की, मी चतुर्थश्रेणी कर्मचा–याप्रमाणे काम करत नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, वर्ग–4 च्या कर्मचा–यांचे काम व माझे काम यात फरक आहे. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मी परिच्छेद क.4 मध्ये बॅंकेविरुध्द खोटे आरोप केलेले आहे. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मी खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे.

उलटतपास – पुर्ण...

फेरतपास – नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/–

दिनांकः 27.03.2023
ठिकाणः औरंगाबाद

(एस.एस.सहस्त्रबुध्दे)
न्यायाधीश,
2रे कामगार न्यायालय क्रं.2, औरंगाबाद.